**केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्रथम कलम १९ (१) व (२) अंतर्गत दाखल केलेल्या प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडील सुनावणी**

नस्ती क्र.अपिल माआअ -२०२५/प्र.क्र.२६/क्षमता बांधणी
PUBHD/A/२०२५/६०२४५

श्री.निलेश अनिल कुरालकर, ......... **अपिलार्थी**
मु.पो.मालेगांव, जि. नाशिक
पिन- ४१३११५........

**विरूद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव ( क्षमता बांधणी)**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
१० वा मजला, ए विंग
गो.ते. रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई- ०१ ........ **प्रतिवादी**

अपिलार्थी यांनी दि. ०७.०७.२०२५ च्या माहिती अर्जाद्वारे, महाराष्ट्र राज्य सेवा वैद्यकीय देखभाल नियम, १९६१ मधील नियम-२ (२) (क) मधील एक वर्षापेक्षा कमी नसलेली सेवा ही अट कोणत्या कर्मचाऱ्यांसाठी आहे याची स्पष्टता द्यावी व शासन सेवेत सरळसेवेने नियुक्त नियमित स्थायी/अस्थायी कर्मचाऱ्यांसाठी अशी अट लागू पडते का याची माहिती द्यावी. तसेच श्री पुरी यांना आपल्या विभागाने ईमेल द्वारे दि. ०६.०२.२०२५ रोजी दुपारी १२.५० वाजता दिलेली माहिती आम्हाला द्यावी. याची तपशीलवार माहिती मागविण्यात आली होती. सदरचा माहिती अर्ज प्रतिवादी यांच्याकडे दि. २८.०७.२०२५ नंतर प्राप्त झाला.

२. माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) नुसार दि.११.०८.२०२५ रोजी PUBHD/A/2025/60245 प्रथम अपिल केले. अपीलार्थीच्या अपील अर्जाच्या अनुषंगाने दि. १६.०९.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता माझ्या दालनात सुनावणी आयोजित केली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी हे व्हीडीओ कॉन्फरन्स द्वारे हजर होते. प्रतिवादी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव ( क्षमता बांधणी) हे प्रत्यक्ष उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलार्थीच्या अपिल अर्जातील मुद्दे विचारात घेण्यात आले. त्यावेळेस अपीलार्थी यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये, महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ मधील अ.क्र. २ व्याख्या या नियमातील (२) (क) मध्ये नमूद केलेली व्याख्या स्वयंस्पष्ट आहे. सदर (क) मध्ये नमूद करण्यात

Scanned with OKEN Scanner

आलेल्या "एक वर्षापेक्षा कमी नसलेली सेवा झालेले व मासिक दराने वेतन घेणारे कार्यव्ययी आस्थापनेवर (Work Charged Establishment) नेमलेले कर्मचारी यांचा समावेश होतो. या कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत काही संभ्रम असेल तर त्या कार्यालयाच्या आस्थापनेने विहित मार्गाने शासनाकडे प्रकरण सादर करावे. शासन सेवेत सरळसेवेने नियुक्त नियमित स्थायी/अस्थायी अनुकंपाद्वारे नियुक्त झालेले कर्मचारी हे शासनाने पूर्ण वेळ नियुक्त केलेले असल्याने त्या कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ मधील नियम २ (२) नुसार सेवेच्या एका वर्षाच्या आत वैद्यकीय प्रतिपूर्ती अनुज्ञेय ठरते असे सुनावणीमध्ये नमूद करण्यात आले. त्याबाबत अपीलार्थी यांनी "ईमेल द्वारे दि. ०६.०२.२०२५ रोजी दुपारी १२.५० वाजता दिलेली माहिती उपलब्ध करून द्यावी व ती माहिती उपलब्ध करून दिल्यास माझे समाधान होईल" असे सुनावणीत सांगितले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना सदर ई-मेल पत्राची प्रत प्राप्त करून ती उपलब्ध करून देण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी सदर ई-मेलची प्रत प्राप्त केलेली आहे. अपीलार्थीच्या मागणीनुसार सदर ई-मेल ची प्रत या आदेशा सोबत जोडण्यात आली आहे.

३. उपरोक्त परिस्थितीत माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त असलेल्या अधिकारानुसार मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे:-

**आदेश**

**अपिलार्थी यांनी माहिती अधिकाराखाली केलेल्या अर्जान्वये मागविलेल्या माहितीसंदर्भात देय असलेली माहितीबाबत, जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (क्षमता बांधणी) यांनी, आपण उपस्थित केलेल्या प्रश्नाचे सुनावणीत निराकरण केले असून, आपण मागितलेली ई-मेलची प्रत या सोबत उपलब्ध करून देण्यात येत आहे.**

**सबब, उक्त अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**२. या आदेशाने अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही तर त्यांनी हे आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ९० दिवसाच्या आत या आदेशाविरूध्द अपीलकर्त्यास खालील प्राधिकरणाकडे दुसरे अपील दाखल करता येईल.**

**मा. राज्य माहिती आयुक्त (बृहन्मुंबई)**
**नवीन प्रशासकीय इमारत, मादाम कामा मार्ग,**
**मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.**

**(विलास बेंद्रे)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,**
**महाराष्ट्र शासन**

**सहपत्र: वरीलप्रमाणे**
**स्थळ: मुंबई**
**दिनांक:- २२.०९.२०२५**

Scanned with OKEN Scanner

९३

# महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, 1961

**CHANDRAKANT WADE** < rakavi2-phd@mah.gov.in >
Thu, 06 Feb 2025 12:50:13 PM +0530

To "puriakl"<puriakl@gmail.com>

महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, 1961 मधील नियम-2 (2) (क) मध्ये, "एक वर्षापेक्षा कमी नसलेली सेवा झालेले व मासिक दराने वेतन घेणारे कार्यव्ययी आस्थापनेवर नेमलेले कर्मचारी यांचा समावेश होतो." महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे सरळसेवेने अथवा शासनाने अनुकंपा तत्वावर नियुक्त केलेले कर्मचारी हे शासनाने पुर्णवेळ तत्वावर नियुक्त केलेले कर्मचारी असून ते महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम 1961 मधील नियम 2 (2) (क) मध्ये मोडत नाहीत, त्यामुळे त्यांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम 1961 मधील नियम २ (२) नुसार सेवेच्या एका वर्षाचे आत वैद्यकिय प्रतिपुर्ती अनुज्ञेय ठरते.
सदर नियमांस अनुसरुन कार्यवाही करण्यामध्ये संभ्रम निर्माण होत असल्यास संबंधित आस्थापनेने वरीष्ठ कार्यालयाचे वा सार्वजनिक आरोग्य विभागाचे रितसर मार्गदर्शन प्राप्त करुन प्रकरणावर निर्णय घेणे अपेक्षित आहे.



Scanned with OKEN Scanner